SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A++' Grade

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/ 46** **दिनांक : 15/02/2024**

## स्मरणपत्र क्रमांक १

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२२-२३**
Web DCF मध्ये माहिती भरण्याबाबत...

**संदर्भ : १) मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रं. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२२-२३ दि.२६/११/२०२२ रोजीचे पत्र.**
**२) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२२-२३/४०, दि. २३/०१/२०२४ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२२-२३ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०५/०१/२०२४ पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२२-२३ करीता माहिती नोंद करावयाची आहे. सदरची माहिती दि. १५/०२/२०२४ पर्यंत वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

सदर माहितीचा आढावा घेतला असता बहुतांशी महाविद्यालयांनी माहिती अद्याप वेबपोर्टलवर नोंद केलेली दिसून येत नाही. **सदरची माहिती भरण्यास विलंब केल्यास किंवा एकाच वेळेस अनेक महाविद्यालयांनी माहिती भरण्यास सुरवात केल्यास सर्व्हर कडून प्रतिसाद योग्यरित्या होत नाही. वेबपोर्टलवर मागील वर्षीपासून नव्याने बदल झाल्यामुळे Web DCF मध्ये माहिती नोंदविण्यास अडचणी निर्माण होत असतात. सदर अडचणी वेळेत Support team कडुन दुरूस्त करून घेता येत नसल्याने माहिती त्वरीत नोंद करावी जेणेकरुन सदरच्या अडचणी वेळेत निर्गमीत करण्यात येतील. वरील सर्व बाबी विचारात घेता माहिती तात्काळ भरून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.** सदरचे स्मरणपत्र ज्या महाविद्यालयांनी माहिती नोंद केलेली आहे अशा महाविदयालयांना लागू नाही. महाविद्यालयांनी माहिती नोंद केली असल्यास व प्रमाणपत्र पाठविले नसल्यास सदरच्या महाविद्यालयांनी प्रमाणपत्र तात्काळ पाठवून देण्यात यावे.

दि.०८/०२/२०२४ रोजी सर्व संलग्नित महाविद्यालयांकरीता AISHE कार्यशाळेचे आयोजन केले होते व सदर कार्यशाळेमध्ये बऱ्याचश्या अडचणींचे निरसन करण्यात आले होते **तथापी, वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**